जन संपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस
**P.R.O.OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY**
Address –Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalwa Bride, Thane West Maharashtra - 400601
**Email Id- cp.thane.pro5@mahapolice.gov.in Contact No. +919819208279**

प्रेसनोटक्र./मा.गु.क./ /२०२४ दिनांक—२४/०८/२०२४

# प्रेस नोट

## घरफोडीतील सराईत गुन्हेगारांना मालमत्ता गुन्हे कक्ष, ठाणे शहर यांनी केले अटक

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील कळवा पो. स्टे. हद्दीत देवकीनंदन बस स्टॉपचेजवळ, खारेगांव, कळवा ठाणे या ठिकाणी झालेल्या घरफोडी चोरीबाबत कळवा पो. स्टे. येथे गुरनं. ११५९/२०२४ भा.न्यां.सं. ३०५(ए), ३३१(३),३३१(४) प्रमाणे दाखल गुन्हयातील आरोपींचा शोध घेणेकरीता समांतर तपास मालमत्ता गुन्हे कक्ष गुन्हे शाखेकडून चालू होता. सदर गुन्हयाचे घटनास्थळा वरील व मार्गक्रमणावरील ठिकठिकाणी असलेले एकुण २५ ते ३० सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, सदर गुन्हयात आरोपीत यांनी चोरी करताना ६६७५ क्रमांकाची रिक्षा वापरल्याचे निदर्शनास येवून सदर रिक्षा त्यांनी चोरी केल्यानंतर मुंब्रा रेल्वे स्टेशन बाहेर सोडून देवून आरोपी यांनी कोणासतरी फोन केल्याचे सि.सि.टि.व्ही मध्ये निदर्शनास आले त्यावरून नमुद ठिकाणावरील डमडाटा घेवून त्यांचे तांत्रिक विश्लेशन करता सदरचा फोन हा ओला उबेर गाडी बुक करण्यास केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर सदर ओला उबेर चालकाकडे चौकशी करता त्याने आरोपीत यांना टिटवाळा येथे सोडल्याचे समजले. त्यावरून आरोपी यांचे मोंबाईल नंबरचे तात्रिक विष्लेशन तसेच लोकेशनवरून तपास करता नमुद आरोपी हे रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले व ते सदर गुन्हयातील मुददेमाल घेवुन उत्तर प्रदेश (न्) येथे पलायन केल्याचे समजले. सदर आरोपींचा मोबाईल फोन लोकेशनव्दारे मागोवा घेता ते त्यांचे मुळ गावावरून कल्याण येथे येत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना कल्याण रेल्वे स्टेशन परिसरातून ताब्यात घेवुन त्यांचे नाव पत्ते घेता त्यांची नावे १)मोहंमद सादीक रिझवान शेख, वय ३५ वर्षे, राह. मामुचाळ, रूम नं. ४, दर्गारोड, बनेली, टिटवाळा, ठाणे २) अहमद रझा अबुबकर सिदद्दीकी, वय ३३ वर्षे, राह. कबीर बिल्डींग रूम नं. ६०२, मांडा, टिटवाळा, जि. ठाणे. असे सांगितले. सदर गुन्हयाबाबत त्यांचेकडे तपास केला असता, त्यांनी घरफोडी चोरीची कबुली देवून गुन्हयातील चोरलेला मुददेमाल हा बनेली येथे बंटी उर्फ नितीन कदम राह. बनेली टिटवाळा यास विकला असल्याचे तसेच गुन्हयात वापरलेली रिक्षा ही कोनगाव परीसरातून चोरी केली असल्याचे सांगीतल्याने सदर आरोपीं यांना रिपोर्टने कळवा पो. स्टे. येथे पुढील तपासकामी दिले आहे.

सदर आरोपी हे रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन ते १) मानपाडा पोलीस ठाणे गुरन ८८३/२०२४ भा.ह. का. कलम ४,२५ सह मपोका कलम ३७(१)१३५ या गुन्हयात तसेच २) कल्याण तालुका पोलीस ठाणे, ठाणे ग्रामिण गुरन ४१०/२०२४ भा.न्या.सं. (बी.एन.एस.) कलम ३०९(६), ११५(२), ३५२, ३५१(२)(३) सह शस्त्र अधिनियम कलम ४,२५ या गुन्हयात पाहिजे असलेले आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर आरोपींना वर्ग करून घेण्याबाबत संबंधीत तपासी अधिकारी यांना कळविले आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त श्री. आशुतोष डुंबरे, मा. सह पोलीस आयुक्त डॉ. श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, मा.अपर पोलीस आयुक्त, डॉ. श्री. पंजाबराव उगले (गुन्हे), मा.पोलीस उप आयुक्त श्री. शिवराज पाटील, गुन्हे ठाणे, मा.सहा.पोलीस आयुक्त श्री. राजकुमार डोगरे, शोध—२, गुन्हे, ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता गुन्हे कक्षाचे वपोनि/आनंद रावराणे, सपोउनि/अर्जुन करळे, पोहवा/४४८७ दिनेश कुंभारे, पोहवा/६५६७ प्रशांत भुर्के, पोहवा/३३७४ किशोर भामरे, पोअं./२०७३ राजकुमार राठोड, पोअं. /४४४ नवनाथ कोरडे, पोअं./४०९४ पाटील, पोअं./१०२९ सदन मुळे यांनी केलेली आहे.

जनसंपर्क अधिकारी
गुन्हे शाखा, ठाणे शहर